**MHAK070000862017**

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४०/२०१७ मधील</u>**
**<u>निशाणी क्र.१ वर आदेश</u>**
(दिनांक १४.११.२०२५)

प्रस्तुत प्रकरणाचा अभिलेख पाहिला. सदर प्रकरणामध्ये दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आलेली असून तपासिक अधिकारी श्री. दादाराव लिखार, सहा पोलीस उप निरीक्षक यांचे साक्षी पुराव्याकरीता प्रस्तुतचे प्रकरण प्रलंबित आहे. सदर प्रकरण हे ८ वर्षे जुने असून तपासिक अधिकारी यांना न्यायालयामध्ये साक्षी पुरावाकामी समन्सची बजावणी झालेली असून त्यांनी साक्षी पुरावा देणेकामी पुढील तारीख मिळणेकामी कळविले आहे. तपासिक अधिकारी हे या आधी न्यायालयामध्ये उपस्थीत राहले असता त्यांना प्रलंबित प्रकरणांची साक्ष देणेकामी सुचना देण्यात आलेली आहे तसेच त्यांना न्यायालयात येणे शक्य नसल्यास व्ही.सी. द्वारे साक्ष नोंदविण्याचे देखील सुचीत करण्यात आले होते. परंतु न्यायालयाच्या निर्देशानुसार देखील तपासिक अधिकारी हे साक्ष नोंदविण्याकरीता न्यायालयात उपस्थीत राहत नसल्यामुळे सदर प्रकरणामध्ये त्यांचा साक्षी पुरावा बंद करण्यात येत आहे. सदर आदेशाची प्रत पोलीस अधिक्षक, अकोला यांना पाठविण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित)

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.11.14 16:51:26 +0530

**दिनांक : १४.११.२०२५.**
**ठिकाणः बाळापूर**

**( डी. एम. वाघमारे )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

## प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | १४/११/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | १४/११/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | १४/११/२०२५ |